# ७. प्रदेश आणि प्रादेशिक विकास

### करून पहा.

खाली काही भौगोलिक क्षेत्रे दिली आहेत. त्यामधील साम्य व प्रकार लक्षात घेऊन तक्ता वहीत पूर्ण करा व पुढील प्रश्नांची उत्तरे द्या. उदाहरण म्हणून एक सोडवले आहे.

**तक्ता क्र. ७.१**

| भौगोलिक क्षेत्र | समान घटक/ वैशिष्ट्ये | प्रकार (प्राकृतिक/ राजकीय) |
|---|---|---|
| गंगा नदी खोरे, ॲमेझॉन नदी खोरे, मिसिसिपी नदी खोरे, नाईल नदी खोरे | नदी | प्राकृतिक |
| हिमालयीन प्रदेश, आल्प्स, पश्चिम घाट, रॉकी, कॉकेशस | | |
| मराठवाडा, विदर्भ, खान्देश, कोकण, पश्चिम महाराष्ट्र | | |
| थरचे वाळवंट, अरब वाळवंट, गोबी वाळवंट, सहारा वाळवंट | | |
| राजस्थान, मध्य प्रदेश, प.बंगाल, केरळ, मणिपूर | | |
| पुणे, भोपाळ, न्यूयॉर्क, मँचेस्टर, म्युनिच, शांघाय | | |
| परभणी, नागपूर, पालघर, कोल्हापूर, सोलापूर | | |
| हिंदी भाषिक पट्टा, बंगाली भाषिक पट्टा, मराठी भाषिक पट्टा, कन्नड भाषिक पट्टा, उर्दू भाषिक पट्टा | | |
| दिल्ली विद्यापीठ आवार, पंजाब विद्यापीठ आवार, मुंबई विद्यापीठ आवार, वनस्थळी विद्यापीठ आवार | | |

१. वरील तक्ता पूर्ण करताना तुम्ही समान घटक कसे ठरवले?

२. एक क्षेत्र दुसऱ्यापेक्षा वेगळे आहे हे तुम्ही कसे ठरवले?

३. समान घटक हा क्षेत्रांमधील फरकासाठी एकमात्र घटक आहे का?

४. त्या घटकांची यादी करा, ज्याद्वारे क्षेत्र वेगळी ओळखता येतील.

### भौगोलिक स्पष्टीकरण

तुमच्या हे लक्षात आले असेल की छोट्या किंवा मोठ्या भूक्षेत्रांना समान वैशिष्ट्यांच्या आधारे ठळकपणे ओळखता येते. ती वैशिष्ट्ये नैसर्गिक (प्राकृतिक) त्याचप्रमाणे मानवनिर्मितही (प्रशासकीय सीमा, राजकीय सीमा किंवा भाषिक) असू शकतात. एका क्षेत्राला दुसऱ्या क्षेत्रापासून वेगळे करणारी एक सीमा असते. भौगोलिक क्षेत्र जे इतर क्षेत्रापेक्षा वेगळे असते अशा क्षेत्राला प्रदेश म्हणतात.

प्रदेश लहान किंवा मोठे असू शकतात. भूरचना, हवामान, मृदा, वनस्पती आणि वन्य जीवन ही वैशिष्ट्ये एखाद्या क्षेत्राला प्रदेश करण्यासाठी कारणीभूत ठरतात. उदा. हिमालय पर्वतीय रांगा आणि उत्तर भारतीय मैदाने यांच्यामध्ये समुद्रसपाटीपासूनची

उंची आणि भूरचना यांनुसार आपण फरक करतो. त्यामुळे हे दोन वेगळे प्रदेश म्हणून ओळखता येतात. सामाजिक-सांस्कृतिक घटक- जसे भाषा, वांशिकता, राजकीय घटक- जसे प्रशासकीय सीमा, आर्थिक घटक- जसे स्थूल राष्ट्रीय उत्पादन इत्यादी. हे मानवनिर्मित घटकही प्रदेश वेगळे करतात. उदा. मध्य प्रदेश आणि महाराष्ट्र ही दोन वेगळी राज्ये (प्रदेश) आहेत. कारण त्यांना त्यांच्या स्वतःच्या सीमा आणि स्वतंत्र प्रशासन आहे. तसेच पुणे आणि अहमदनगर हे दोन वेगवेगळे जिल्हे आहेत. म्हणून ते दोन वेगळे प्रदेश मानले जातात. एका प्रदेशामध्ये दोन किंवा अधिक उपप्रदेश असू शकतात. उदा. उत्तर भारतीय मैदानी प्रदेशात अनेक उपप्रदेश आहेत. जसे, सिंधू आणि तिच्या उपनद्या, गंगा-यमुनेचे मैदान आणि ब्रह्मपुत्रा-हुगळीचे मैदान. तसेच जिल्ह्यांमध्ये तालुके असतात. प्रत्येक तालुका हा एक प्रदेश असतो. तालुक्यातील प्रत्येक गाव/शहर हेदेखील या रचनेत प्रदेश होऊ शकतात.

प्रदेशाचे वर्गीकरण हे समान वैशिष्ट्यांवर आधारित असते. ज्या क्षेत्रामध्ये समान गुणधर्म असतात व जे एकसंध असतात अशा क्षेत्रास प्रदेश असे म्हणतात. भौगोलिक अभ्यासात प्रदेश हा मूलभूत एकक असतो. प्रदेशामुळे एक क्षेत्र दुसऱ्या क्षेत्रापासून वेगळे करता येते. एखादे क्षेत्र प्रदेश म्हणून संबोधण्यासाठी खालील वैशिष्ट्यांची आवश्यकता असते.

- **स्थान** – प्रदेशाला भौगोलिक स्थान असणे आवश्यक असते. हे स्थान वृत्तांनी दाखवता आले पाहिजे.
- **भौगोलिक विस्तार** – एकसंधतेच्या आधारे प्रदेशाचा विस्तार निश्चित होतो.
- **सीमा** – प्रदेशाला स्वतःची सीमा असते. या सीमांकनाच्या पलीकडे दुसरा प्रदेश सुरू होतो.
- **श्रेणीबद्ध उतरंड** – समान गुणधर्माच्या आधारे सदर प्रदेशाची श्रेणीबद्ध उतरंड करता येते. उदा. उत्तर भारतीय मैदानी प्रदेश आणि त्याचे उपप्रदेश.

**माहीत आहे का तुम्हांला?**

भारत स्वतंत्र झाल्यानंतर १९५६च्या राज्य पुनर्गठन कायद्याने भाषेनुसार राज्याच्या सीमा निश्चित करण्यात आल्या. त्यानुसार महाराष्ट्र हे मराठी भाषा बोलणाऱ्या लोकांचे, तर तामिळनाडू हे तामीळ भाषा बोलणाऱ्या लोकांचे स्वतंत्र प्रदेश झाले.

**जरा डोके चालवा.**

कोणत्या वैशिष्ट्यांच्या आधारे आपण खालील क्षेत्र प्रदेश म्हणून विचारात घेऊ शकतो?

१. पुणे महानगर प्रदेश

२. नागपूर हब

३. जम्मू काश्मीरमधील दाल सरोवर


४. अलेप्पी पर्यटन केंद्र

### प्रदेशांचे प्रकार :

**भौगोलिक स्पष्टीकरण**

वैशिष्ट्यांच्या आधारे प्रदेशांचे विभाजन हे प्राकृतिक प्रदेश आणि राजकीय प्रदेश असे केले जाते. उदा. नद्यांची खोरी हे प्राकृतिक प्रदेश तर जिल्हे हे राजकीय प्रदेश आहेत. दोन्हीही औपचारिक प्रदेश आहेत. ह्या औपचारिक प्रदेशांत वास्तव्य करणाऱ्या लोकसमूहात एक किंवा अनेक वैशिष्ट्ये समान असू शकतात. भौगोलिक प्रदेश पारिभाषित करताना समान भाषा, आर्थिक क्रिया, ठरावीक पीक उत्पादन किंवा प्राकृतिक वैशिष्ट्यांमधील प्रादेशिक हवामान हे घटक विचारात घेतले जातात. प्रत्येक औपचारिक प्रदेशाला वेगळ्या सीमा असतात, ज्यामुळे प्रदेश ओळखणे सोपे जाते. उदा. राज्य किंवा देश. युरोप, दक्षिण आफ्रिका, अमेरिकेची संयुक्त संस्थाने, कॅनडा किंवा आसाम, पश्चिम बंगाल इत्यादी.

याउलट कार्यात्मक प्रदेश हे कार्याशिवाय इतर कोणत्याही औपचारिक वैशिष्ट्यांनी बांधलेले नसतात. कार्यात्मक प्रदेश हे एकजिनसी नसू शकतात. ते एकापेक्षा अधिक प्राकृतिक किंवा राजकीय प्रदेश प्रकारात समाविष्ट असू शकतात. परंतु ते एका कार्यात्मक प्रदेशात असू शकतात. कारण त्यांचे कार्यबंधन त्या प्रदेशांना एकत्र आणते. उदा. पुणे महानगर प्रदेशात अनेक प्राकृतिक प्रदेश, अनेक राजकीय प्रदेश, विविध प्रकारची खेडी, तालुके आणि शहरे येतात. तरीही ही क्षेत्रे आर्थिक क्रियांमुळे एकमेकांशी बांधलेली आहेत. भाजीपाला, फुले, इतर नाशवंत




आकृती ७.१ – औपचारिक प्रदेश आणि कार्यात्मक प्रदेश यांतील फरक

माल ह्या सेवा मुख्य शहराला आजूबाजूच्या प्रदेशांकडून पुरविल्या जातात. गाभाक्षेत्र त्यासाठी सभोवतालच्या क्षेत्राला त्याच्या उत्पादनांसाठी मूल्य देते. कार्यात्मक प्रदेश सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या एकच एकक म्हणून कार्य करण्यासाठी निर्माण केला जातो. कार्यात्मक प्रदेश हे केंद्रबिंदूभोवती केंद्रित झालेले असतात. जे विविध प्रणालींद्वारे इतर क्षेत्रांस जोडले जातात. जसे की वाहतूक, संदेशवहन किंवा आर्थिक क्रिया. शहरे ही कार्यात्मक प्रदेश होऊ शकतात. कारण महामार्ग, लोहमार्ग, भुयारी मार्ग आणि बसेसच्या माध्यमातून उपनगरांकडून शहराच्या मध्यवर्ती भागाकडे व परत, अशी लोकांची वाहतूक केली जाते. त्याचबरोबर दूरदर्शन प्रसारण केंद्राचे क्षेत्र, बिनतारी संदेश यंत्रणेचे संदेशवहन क्षेत्र, वाय-फाय, हॉट-स्पॉटचे प्रभाव क्षेत्र हीदेखील कार्यात्मक प्रदेशाची उदाहरणे आहेत. आकृती ७.१ पहा.

### करून पहा.

खालील प्रदेशांच्या यादीत औपचारिक व कार्यात्मक प्रदेश असे वर्गीकरण करा.

उजनी धरण पाणलोट क्षेत्र, पुणे महानगर पालिका वाहतूक सेवा क्षेत्र, सिटी केबल सेवा क्षेत्र, उत्तर प्रदेश, कोल्हापूर जिल्हा, हवेली तालुका, कोकणातील तांदूळ उत्पादक प्रदेश, भारतातील रेगुर मृदा प्रदेश, मुंबईतील उपनगरीय रेल्वे सेवा क्षेत्र, प्राथमिक आरोग्य केंद्र सेवा क्षेत्र.

| औपचारिक प्रदेश | कार्यात्मक प्रदेश |
|---|---|
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |

### जरा डोके चालवा.

- तुमचा स्वतःचा औपचारिक प्रदेश कोणता ?
- तुमचा स्वतःचा कार्यात्मक प्रदेश कोणता ?
- यांपैकी कोणता प्रदेश मोठा आहे ते ओळखा.

## प्रादेशिक विकास –

आपण पाहिले की प्रत्येक प्रदेश हा आकाराने, लोकसंख्येने आणि साधनसंपत्तीने समान नसतो. वाळवंटी प्रदेशात

साधनसंपत्तीची कमतरता असते. तर वन प्रदेशात मुबलक साधनसंपत्ती असते.

### सांगा पाहू?

तक्ता ७.२ चे वाचन करून प्रश्नांची उत्तरे लिहा :

**तक्ता ७.२**

| प्रदेश | दरडोई उत्पन्न (₹) | दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण (%) | नागरीकरण (%) | एकूण लागवडीखालील क्षेत्रापैकी निव्वळ सिंचनाखाली असलेले क्षेत्र (%) | एका वर्षातील दरडोई वीजवापर (युनिटमध्ये) |
|---|---|---|---|---|---|
| अ | १५४६६ | १४ | ४५ | ६४ | ५५७ |
| आ | १०४३२ | ३२ | ३१ | ४२ | ३३२ |
| इ | ५००० | ४८ | १६ | २८ | १४५ |

१. कोणत्या प्रदेशात अधिक संसाधने उपलब्ध आहेत, असे तुम्हांस वाटते?

२. कोणत्या प्रदेशातील लोक श्रीमंत आहेत, असे तुम्हांस वाटते?

३. कोणत्या प्रदेशातील लोक अधिक समाधानी असतील असे तुम्हांस वाटते? का?

४. तुम्हांला असे वाटते का, की दिलेले निर्देशांक किंवा घटक, तेथील लोकांचे जीवनमान निश्चित करण्यासाठी पुरेसे आहेत?

५. कोणत्या प्रदेशात राहणे तुम्हाला आवडेल? का?

### भौगोलिक स्पष्टीकरण

दिलेल्या सारणीत काही निर्दशकाद्वारे तीन प्रदेशांची कामगिरी दाखवली आहे. दिलेल्या सांख्यिकीय माहितीच्या आधारे आपण असे म्हणू शकतो की 'अ' प्रदेशाची कामगिरी 'आ' किंवा 'इ' पेक्षा चांगली आहे.

दरडोई उत्पन्न असे दर्शविते की, 'अ' प्रदेशाचे उत्पन्न आणि उत्पादन जास्त आहे. याचाच अर्थ इतर प्रदेशांपेक्षा येथील लोकसंख्या कमी आहे. दरडोई उत्पन्न कमी म्हणजे एक तर लोकसंख्या जास्त आहे किंवा लोकसंख्या जास्त असून एकूण उत्पन्नही कमी आहे. यातून असे सूचित होते की, सर्वसाधारणपणे एका प्रदेशात साधनसंपत्तीची कमतरता आणि साधनसंपत्तीचा वापरही कमी आहे. 'आ' प्रदेशामध्ये 'अ' आणि 'इ' प्रदेशांपेक्षा नागरीकरण जास्त आहे. तसेच लागवडीखालील क्षेत्रापैकी सिंचनाखाली असलेले क्षेत्रही जास्त आहे. यावरून असे निदर्शनास येते की, त्या प्रदेशात जलसिंचन सुविधा चांगल्या आहेत. तसेच दोन्ही प्रदेशांपेक्षा विजेचा वापरही जास्त आहे. निदर्शकांवरून या प्रदेशातील जीवन इतर दोन प्रदेशांपेक्षा चांगले असू शकते.

प्रदेशाचे संपूर्ण चित्र सुस्पष्ट करण्यास केवळ एवढेच निर्देशक पुरेसे नाहीत. साक्षरता दर, शाळेतील नोंदणी गुणोत्तर, शाळा सोडण्याचे प्रमाण, लिंग-गुणोत्तर, महिला आणि मुलांवरील गुन्हेगारी असे इतरही निर्दशकांद्वारे प्रदेशांचे जास्त सुस्पष्ट चित्र मिळते. प्रदेशाच्या विविध सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक आणि पर्यावरणीय परिस्थितीवर निर्दशकांची संख्या आधारित असते.

अशाप्रकारे प्रदेशाचा विकास हा तेथील साधनसंपत्तीवर आणि लोकसंख्येच्या कार्यावर अवलंबून असतो. प्रदेशाच्या विकासावर परिणाम करणारे अनेक घटक आहेत. प्रदेशाच्या सर्वांगीण विकासासाठी कुशल मनुष्यबळ आणि नैसर्गिक संसाधनांचा इष्टतम वापर करणे आवश्यक आहे. अशाप्रकारचा विकास म्हणजे संपूर्ण प्रदेशाचा विकास. म्हणजेच एकाचवेळी नैसर्गिक व मानवी संसाधनांचा योग्य उपयोग करून दरडोई उत्पन्न वाढविणे व जीवनमान उंचावणे होय.

### जरा विचार करा.

- संसाधनांचा जास्तीतजास्त वापर केल्याने प्रदेशाचा विकास होतो का?
- प्रदेशाच्या विकासासाठी पर्यावरण हा निदर्शक ठरू शकतो का?
- एखाद्या प्रदेशात विरळ लोकसंख्या असल्यास किंवा तो प्रदेश निर्मनुष्य असल्यास त्या प्रदेशाला विकसित प्रदेश म्हणता येईल का?

– वर्गात चर्चा करा.

### करून पहा.

खालील सारणीत काही प्रदेश दिलेले आहेत, तसेच काही भौगोलिक घटक व परिणामही सुचवले आहेत. सोडवलेल्या उदाहरणाच्या आधारे उर्वरित तक्ता पूर्ण करा.

तक्ता ७.३

| प्रदेश | भौगोलिक घटक | प्रदेशावरील परिणाम |
|---|---|---|
| नाईल नदीचे खोरे | | कृषी, उद्योगधंदे, जलविद्युत प्रकल्प, जलसिंचन विकास इत्यादी |
| | सूचीपर्णी वनक्षेत्र | |
| जपान | बेट, भौगोलिक स्थान, कमीत कमी खनिज संपत्ती, देशाचा अरुंद आकार | |
| इंडोनेशिया, मलेशिया | | कृषी विकास, व्यापार, पर्यटन |

### प्रादेशिक विकासावर परिणाम करणारे घटक :

भूगोलाच्या अभ्यासात प्रादेशिक विकासाबद्दल चर्चा करताना आपण अनेक घटकांचा विचार करत असतो. विकास ही एक सापेक्ष संज्ञा आहे. विकास मोजण्यासाठी बरेच मापदंड आहेत. विविध क्रियांद्वारे त्या क्षेत्रातील उत्पन्न, लोकसंख्येचे प्रमाण आणि गुणवत्ता, शिक्षण, आयुर्मान, दारिद्र्यतेचे प्रमाण इत्यादी विकासाचे काही मापदंड आहेत, परंतु विकासाचा कोणताही एक मापदंड एखाद्या क्षेत्राचा विकास ठरविणारा एकमात्र घटक असू शकत नाही. एक किंवा काही घटक निवडून प्रादेशिक विकासाचा सर्वांगीण विचार करता येत नाही. सर्वसाधारणपणे जेव्हा एखाद्या क्षेत्राच्या विकासाचा विचार केला जातो तेव्हा प्राकृतिक, सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय इत्यादी बाबी लक्षात घेतल्या जातात.

आतापर्यंत या इयत्तेत आपण लोकसंख्या, भूमी उपयोजन, मानवाच्या आर्थिक क्रिया यांचा अभ्यास केला आहे. हे सर्व घटक प्रदेशाच्या विकासावर कसे परिणाम करतात ते आपण पाहू या.

### प्राकृतिक घटक आणि प्रादेशिक विकास :

प्रदेशाच्या वितरणावर हवामान आणि तेथील प्राकृतिक रचना यांसारख्या प्राकृतिक घटकांचा परिणाम होतो. जिथे मृदा कमी सुपीक असते, जिथे पाण्याची कमतरता असते, हवामान रोगट असते, अशा ठिकाणी विकास कमी होतो. उदाहरणार्थ, उष्णकटिबंधीय वर्षावने. याच्या उलट जर मृदा सुपीक असेल, अनुकूल हवामान आणि चांगला पाऊस होत असेल तर त्या प्रदेशात विकासास चालना मिळते. उदा. भूमध्यसागरी हवामान.

प्रदेशाची प्राकृतिक रचना हीदेखील महत्त्वाची आहे. जर प्रदेश भूवेष्टित असेल किंवा उंच पर्वतरांगांमध्ये वसला असेल; जेथे सुगम नद्या, लांब किनारी प्रदेश, चांगली नैसर्गिक बंदरे नसतील तर इतर नैसर्गिक संसाधनांच्या स्रोतांद्वारे या भागाचा विकास होऊ शकतो. काही वेळेस मोठ्या प्रमाणात संसाधने असतात, परंतु हवामान अनुकूल नसते किंवा त्यांचा उपभोग करण्यासाठी पुरेशी लोकसंख्या नसते. उदा. अंटार्क्टिका.

### लोकसंख्या आणि प्रादेशिक विकास :

**सांगा पाहू?**

- लोकसंख्या संक्रमणाच्या पाच टप्प्यांचा विचार करता कोणत्या टप्प्यातील देश हे विकसित आहेत असे म्हणता येईल?
- लोकसंख्या मनोऱ्याचे तीन प्रमुख प्रकार लक्षात घेता कोणता मनोरा विकसित देशांशी निगडित आहे? (आकृती २.१ पहा)
- वरील दोन्ही प्रश्नांच्या उत्तरांचा विचार करता लोकसंख्येची प्रादेशिक विकासातील भूमिका स्पष्ट करा.

**भौगोलिक स्पष्टीकरण**

लोकसंख्या आणि प्रादेशिक विकास यांचा जवळचा संबंध आहे. प्रादेशिक विकासाचे सर्व मापदंड हे लोकसंख्या डोळ्यासमोर ठेवून तयार केले जातात. विकास व लोकसंख्या हे दोन्ही घटक एकमेकांवर परिणाम करत असतात. प्रदेशाच्या

विकासासाठी लोकसंख्येची आकडेवारी / लोकसंख्या आणि लोकसंख्येची गुणवत्ता या दोन्ही बाबी आवश्यक असतात.

प्रदेशातील साधनसंपत्तीवर लोकसंख्येचे वय, घनता, जन्मदर, मृत्युदर, व्यवसायातील रचना, प्रजननक्षमता, जीवनमान/आयुर्मान इत्यादी घटकांचा ताण पडत असतो. परंतु त्याच वेळेस हे घटक प्रदेशातील साधनसंपत्ती सुयोग्य प्रकारे कशी वापरावी हे ठरवण्यासाठीही कारणीभूत ठरतात.

लोकसंख्या संक्रमणाच्या टप्प्यांचा विचार करता चौथ्या आणि पाचव्या टप्प्यांत जन्मदर आणि मृत्युदराच्या प्रमाणात कमालीची घट होत जाते. परिणामी कमी जन्मदरामुळे जास्त विकास शक्य होतो. कारण खर्च वाढवणारे लोकसंख्येचे वयोगट कमी असतात, त्यामुळे खर्च कमी होतो. त्याच वेळेस लोकसंख्येची गुणवत्ताही महत्त्वाची असते.

रोजगार, उपभोगाचा आकृतिबंध, सामाजिक गरजा आणि लोकसंख्येची मानसिक वैशिष्ट्ये हे लोकसंख्या मनोऱ्यामुळे स्पष्ट होतात. उच्च अवलंबित्वाचे प्रमाण संसाधनांचा उपभोग वाढवते. त्यामुळे यावर मोठ्या प्रमाणात भांडवली खर्च होत असतो. परंतु लोकसंख्येच्या प्रमाणातील कार्यशील गटाचे प्रमाण जास्त असल्यास आर्थिक विकासाची शक्यता जास्त असते व राहणीमान उच्च दर्जाचे होते.

स्थलांतरित लोकांचे प्रमाण एखाद्या प्रदेशात जास्त असल्यास त्या प्रदेशातील लोकसंख्येचा विविध आर्थिक क्रियांसाठी वापर करून घेण्यामध्ये फार अडचणी येतात. प्रदेशात लोकसंख्या स्थलांतरित होते याचा अर्थ ज्या प्रदेशात रोजगाराची सुसंधी असते तेथील राहणीमानाचा दर्जा उच्च असतो. हे लोकसंख्येला आकर्षित करणारे घटक आहेत. त्याचबरोबर स्थलांतरित लोकसंख्येमुळे प्रदेशाच्या साधनसंपत्तीवर, सोयीसुविधांवर ताण पडण्याची शक्यताही असते.

लोकसंख्या जेवढी जास्त, दरडोई उत्पन्न तेवढे कमी हे तत्त्व तुम्हांला माहीत आहे. याचाच अर्थ असा की, दरडोई उत्पन्न हे विकासाचे एक मानक आहे, तर दुसरीकडे कमी लोकसंख्या ही प्रदेशाच्या विकासाला मारकही ठरते. कारण उपलब्ध साधनसंपत्तीचा पुरेसा वापर होत नाही.

**पहा बरे जमते का?**

**तक्ता ७.४**

| प्रदेश | शाळेत येऊ घातलेल्या कुपोषित मुलांची टक्केवारी | शिक्षणावर सरकारी खर्च (एकूण अर्थसंकल्पाची टक्केवारी) |
|---|---|---|
| | वर्ष २०१६ | वर्ष २०१६ |
| अ | २९.३ | ४.७० |
| आ | १९.२ | ४.१७ |
| इ | ३.४ | ७.१० |
| ई | १२.८ | ५.४० |
| उ | ३१.७ | ४.०९ |
| ऊ | २७ | ४.४५ |
| ए | ३.१ | ३.८२ |
| ऐ | ५.९ | ५.९५ |

दिलेल्या माहितीच्या आधारे तुमचे निष्कर्ष लिहा. तसेच स्पिअरमॅन गुणानुक्रम सहसंबंधाच्या आधारे दोन्ही चलांमधील सहसंबंधांची गणना करा. या प्रदेशातील विकासाबद्दल तुम्ही काय सांगू शकाल?

## भूमी उपयोजन आणि प्रादेशिक विकास

विकसित व अविकसित प्रदेशांच्या भूमी उपयोजनाचा जर काळजीपूर्वक अभ्यास केला तर असे लक्षात येते की, भूमीची वेगवेगळ्या कामासाठी वापराची टक्केवारी दोन्ही प्रदेशांत वेगळी असते. समाजाच्या गरजेनुसार भूमी उपयोजनात फरक पडताना दिसतो. जसजशी प्रदेशाची सामाजिक-आर्थिक परिस्थिती बदलते तसतसे भूमी उपयोजनही बदलत जाते. ग्रामीण आणि नागरी भूमीचे उपयोजनही बदलत जाते. ग्रामीण आणि नागरी भूमीच्या उपयोजनातही बराच फरक सहज आढळतो. ग्रामीण भागातील जमीन मोठ्या प्रमाणात शेतीसाठी, गायरानासाठी वापरली जाते, तर नागरी भागात जमिनीचा वापर मोठ्या प्रमाणावर निवासी, व्यावसायिक उपयोग इत्यादींसाठी केला जातो. प्रदेशातील लोक तेथील जमिनीचा वापर कसा करतात त्यानुसार त्या प्रदेशाच्या विकासाचे भवितव्य ठरते.

जसजशी लोकसंख्या व लोकांच्या महत्त्वाकांक्षा वाढत जातात, तसतशी जमिनीची उपलब्धता कमी होत जाते. त्यामुळे सारासार विचार करून भूमीचा वापर केल्यास भूमी उपयोजनाचा नकारात्मक परिणाम टाळता येतो. तसेच भूमीचा पुरेपूर वापर व प्रदेशातील साधनांचा वापरही योग्य पद्धतीने करता येतो, जो

विकासासाठी परिणामकारक ठरतो. जेणेकरून त्याचा दुष्परिणाम पुढील पिढीस भोगावा लागत नाही. जसजसा आर्थिक विकासाचा वेग वाढत जातो तसतसे ग्रामीण भागाचे नागरीकरण होण्याची क्रियाही वाढत जाते. त्यामुळे ग्रामीण ते उपनगर, उपनगर ते नगर होण्याची क्रिया जलद गतीने होते.

**करून पहा.**

भूमी उपयोजन तक्त्याचा अभ्यास करून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा:

**तक्ता क्र.७.५**

| प्रदेश | लागवडीयोग्य भूमी (%) | कायम पिकांखालील भूमी (%) | चराऊ कुरणांखालील भूमी (%) | वनांखालील भूमी (%) | इतर भूमी (%) | स्थूल राष्ट्रीय उत्पन्न (डॉलरमध्ये) (२०१७) |
|---|---|---|---|---|---|---|
| अ | ११.८ | ०.३ | ४६.० | २.१ | ३९.९ | ७६.४८ |
| आ | ४.० | ०.०४ | ४४.० | २०.१ | ३२.१ | १३६४.८३ |
| इ | ५२.० | १६.० | ४.१ | ९.७ | १७.९ | ८३७.५८ |
| ई | २७.४ | ०.८ | १५.३ | २२.४ | ३२.६ | ५६७.४८ |
| उ | ६.५ | १.० | १६.७ | ५७.० | १९.२ | ३४५६.३५ |
| ऊ | ५७.८ | ०.६ | ५.५ | १४.३ | २१.८ | ३१२.८४ |
| ए | २.८ | १.० | ०.०० | ०.१ | ९५.६ | १३९१.२५ |
| ऐ | ३३.६ | १.८ | १६.८ | ३१.० | १६.४ | ३०६१.१४ |
| ओ | ५०.१ | ४.१ | ३.१ | २१.८ | २०.८ | ११३२५.६६ |
| औ | १३.७ | १३.० | ५.७ | ४८.५ | १९.० | ३७३७.४८ |
| अं | ११.०० | ०.८ | २.६ | ६६.० | १९.७ | ५७४७.४९ |
| अः | २.५ | ०.५ | ३७.५ | ३७.७ | २१.८ | २०६.२२ |

१. वरील तक्ता काय दर्शवितो ?

२. कोणत्या प्रदेशात शेतीखालील जमीन सर्वांत जास्त आहे ?

३. सर्वाधिक राष्ट्रीय उत्पन्न कोणत्या प्रदेशाचे आहे ?

४. कोणत्या प्रदेशात वनांखालील जमीन जास्त आहे ?

५. कोणत्या प्रदेशात इतर भूमी या वर्गात असलेले भूमी उपयोजन सर्वाधिक आहे ? त्या प्रदेशाचे स्थूल राष्ट्रीय उत्पन्न किती ?

६. तुमचे निष्कर्ष आपल्या वाक्यांत लिहा.

## प्राथमिक, द्‌वितीयक आणि तृतीयक आर्थिक क्रिया आणि प्रादेशिक विकास

तक्ता क्र.७.६ पाहा आणि पुढील प्रश्नांची उत्तरे द्या:

**तक्ता क्र.७.६**

| प्रदेश | जीडीपीमध्ये प्राथमिक क्षेत्राचे योगदान (%) | जीडीपीमध्ये द्‌वितीयक क्षेत्राचे योगदान (%) | जीडीपीमध्ये तृतीयक क्षेत्राचे योगदान (%) | मानवी विकास निर्देशांक (HDI) |
|---|---|---|---|---|
| | २०१८ | २०१८ | २०१८ | २०१८ |
| अ | १ | ३४ | ६५ | ०.९३ |
| आ | २ | ३२ | ६६ | ०.८५ |
| इ | २ | ३७ | ६१ | ०.७१ |
| ई | ६ | ३३.२ | ६०.८ | ०.८१ |
| उ | १४ | ३० | ५६ | ०.६५ |

१) कोणत्या प्रदेशात प्राथमिक क्रियांचे योगदान सर्वांत कमी आहे ?

२) प्राथमिक आर्थिक क्रियांचे सर्वाधिक योगदान कोणत्या प्रदेशात आहे ?

३) कोणत्या प्रदेशात तृतीयक क्षेत्राचे योगदान अधिक आहे ?

४) कोणत्या प्रदेशात मानवी विकास निर्देशांक सर्वाधिक आहे ?

५) प्रश्न १ ते प्रश्न ४ मधील उत्तरांच्या आधारे निष्कर्ष काढू शकतो का ?

**भौगोलिक स्पष्टीकरण**

कोणत्याही प्रदेशात चालत असलेल्या या तीन प्रकारच्या आर्थिक क्रियांमुळे त्या प्रदेशातील प्रादेशिक विकासाची कल्पना येते. सर्वसाधारणपणे असे दिसून येते की तृतीयक आर्थिक क्रियेचा अधिक वाटा असल्यास आणि प्राथमिक कामांवर कमी अवलंबून असल्यास तो प्रदेश विकसित आहे असे मानता येते. मानवी विकास निर्देशांक (HDI) सारख्या विविध निर्देशांकांचा उपयोग प्रदेशातील विकासाच्या विविध पैलूंचे मूल्यांकन करण्यासाठी केला जातो. सामान्यत: तृतीयक क्रिया (व्यवसाय) या क्षेत्राच्या उत्पन्नात अधिक योगदान देतात आणि म्हणूनच अधिक विकास दिसून येतो.

## प्रादेशिक असंतुलन :

संतुलित प्रादेशिक विकासाच्या धोरणात आर्थिक, सामाजिक, राजकीय या बाबतीत विचार केला जातो. या

धोरणामध्ये देशातील वेगवेगळ्या प्रदेशांमधील असमानतेचे निवारण करून राहणीमानाचा दर्जा उंचावून एकसमान दराने उच्च पातळीवर आणण्याचा विचार केला जातो.

## भारतातील प्रादेशिक विषमतेची कारणे

प्रदेशाच्या विकासावर विविध घटकांचा कसा परिणाम होतो, हे तुम्ही अभ्यासले. भारताचा प्रदेश म्हणून विचार करताना या प्रदेशातील उपप्रदेशांत तुम्हांला प्रादेशिक असमतोल सहज जाणवतो. या प्रदेशांच्या विकासातही फरक पाहावयास मिळतो. स्थान, भूउठाव, समुद्रसपाटीपासूनची उंची, संसाधनांची उपलब्धता, सुगमता इत्यादी घटक प्रादेशिक विषमतेस जबाबदार असतात.

भौगोलिक स्थान, खनिज व इतर नैसर्गिक स्रोतांच्या बाबतीत काही क्षेत्रांची स्थिती चांगली आहे, तर इतर या बाबतीत मागे पडत आहेत. उदाहरणार्थ, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड यांसारख्या डोंगर आणि घनदाट जंगलांनी वेढलेले दुर्गम भूभाग असलेली राज्ये, ईशान्येकडील अनेक राज्ये अधिक खनिज व अन्य संसाधने असलेल्या इतर प्रदेशांच्या मागे आहेत. ज्या प्रदेशांमध्ये बंदरे आणि विमानतळ आहेत अशा प्रदेशाला त्यांच्या स्थानांचा इतरांपेक्षा फायदा मिळतो. उदाहरणार्थ, आपल्याला माहीत आहे की लोह आणि स्टील उद्योगांचे स्थान निर्धारित करताना, कच्च्या मालास जवळ असणे हा निकष आहे.

अशा वेळेस ज्या प्रदेशात कच्च्या मालाची सहज उपलब्धता असते त्या प्रदेशाला त्याचा इतरांपेक्षा फायदा मिळतो. विषम हवामान व नियमितपणे नैसर्गिक आपत्तीस बळी पडणाऱ्या (उदा. पूर, चक्रीवादळे इत्यादी) प्रदेशातील विकासाचा दर कमी असतो. असा प्रदेश कृषी उत्पादन व औद्योगिक विकासात मागे पडतो.

प्रदेश विकासातील फरकात मानवी घटकही महत्त्वाची भूमिका बजावतात. कुशल कामगार, तंत्रज्ञान, वाहतूक, बाजारपेठ सान्निध्य, संदेशवहनाच्या सोयी, बँका व विमा इत्यादी मानवी घटकही प्रादेशिक विषमतेस कारणीभूत असतात. उदा. ईशान्य भारत, हिमाचल प्रदेश इत्यादी प्रदेशांत या घटकांचा अभाव असल्याने हे घटक कमी विकसित झालेले आढळतात.


ज्या प्रदेशात मूलभूत सोयीसुविधांचा विकास झालेला असतो अशा प्रदेशांत खाजगी क्षेत्रे गुंतवणूक करण्यास कायम उत्सुक असतात. अशा क्षेत्रात गुंतवणूक केंद्रित होते. शासनमान्य निर्णयानुसारदेखील मोठे उद्योग किंवा उपक्रम एखाद्या प्रदेशात वाढतात, याचा त्या प्रदेशातील लोकांना फायदा होतो.

## प्रादेशिक असमतोल दूर करण्याची धोरणे

भारतामध्ये प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी अनेक योजना राबवण्यात आल्या आहेत. सुरुवातीस अविकसित प्रदेश शोधले जातात व नंतर हे प्रदेश अविकसित राहण्यामागची कारणे शोधली जातात. असे प्रदेश शोधण्यासाठी विविध निकष लावले जातात. जसे, सामाजिक, आर्थिक इत्यादी घटक. या निकषांनुसार प्रादेशिक असमतोल कमी करण्यासाठी निधींची तरतूद करण्यात येते व ठरावीक विभागात विभागनिहाय गुंतवणूक केली जाते. या प्रदेशात निधी देताना तो अनुदानाच्या स्वरूपात दिला जातो. तसेच रस्ते, शाळा, कृषिसिंचन, उद्योग, गृह, वैद्यकीय व आरोग्यविषयक सुविधा इत्यादींच्या विकासासाठी आर्थिक मदत/तरतूद केली जाते. आदिवासी प्राबल्य क्षेत्र, पर्वतीय क्षेत्र, ओसाड क्षेत्र, दुष्काळग्रस्त क्षेत्र या प्रदेशांसाठी अनुदान व निधी देताना विशेष काळजी घेतली जाते. उद्योगांचे विकेंद्रीकरण हे धोरणदेखील प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी वापरले जाते.

### पहा बरे जमते का?

आकृती ७.२ चे निरीक्षण करा व प्रत्येक घटकाबद्दल दोन वाक्ये लिहा आणि प्रादेशिक असंतुलन कमी करण्यास ते कसे मदत करतील ते लिहा. आवश्यकता असल्यास यादीमध्ये आणखी काही उदाहरणांचा समावेश करा.




आकृती ७.२

**शोधा पाहू!**

मानवी आनंद निर्देशांक म्हणजे काय ते शोधा. त्याचा प्रादेशिक विकासाशी सहसंबंध जोडा व वर्गात चर्चा करा.

## स्वाध्याय

**प्र.१. अचूक गट ओळखा.**

१.अ) १) सातपुडा
२) दख्खन
३) आल्प्स
४) रॉकीज

ब) १) यवतमाळ
२) अमरावती
३) सोलापूर
४) बृहन्मुंबई

क) १) थर
२) सहारा
३) हिमालय
४) गोबी

ड) १) मराठवाडा
२) खान्देश
३) विदर्भ
४) कोकण

२.अ) १)मैदाने
२) सरोवर
३) पर्वत
४) पठारे

ब) १) वायुदाब
२) नद्या
३) तापमान
४) आर्द्रता

क) १) विषुववृत्तीय वने
२) काटेरी वने
३) सुंदरी वने
४) पानझडी वने

ड) १) मासेमारी
२) लाकूडतोड
३) शेती
४) बेकरी

**प्र.२. फरक स्पष्ट करा.**

१) कार्यात्मक प्रदेश व औपचारिक प्रदेश
२) प्राकृतिक प्रदेश व राजकीय प्रदेश

**प्र.३. टिपा लिहा.**

१) प्रादेशिक विकासावर परिणाम करणारे घटक
२) प्रादेशिक असंतुलन कमी करण्याचे धोरण

**प्र.४. भौगोलिक कारणे लिहा.**

१) प्रादेशिक विकास हा प्राकृतिक रचनेवर अवलंबून असतो.
२) निरक्षरता, दारिद्र्य यांसारख्या घटकांचा प्रादेशिक विकासावर परिणाम होतो.
३) हिमालयीन पर्वतीय प्रदेशाचा विकास फारसा झालेला नाही.

**प्र.५. सविस्तर उत्तरे लिहा.**

१) प्रदेश कशाला म्हणतात?
२) कोणत्या वैशिष्ट्यांच्या आधारावर प्रदेश वेगळे केले जातात? उदाहरणे द्या.
३) दरडोई उत्पन्न हे प्रादेशिक विकासाचे निर्देशक नाही, स्पष्ट करा.

**प्र.६.** कायम पिकांखालील भूमी व स्थूल राष्ट्रीय उत्पन्न यांचा स्पिअरमॅनचे गुणानुक्रम सहसंबंधांचा वापर करून सहसंबंध गणना करा व तुमच्या शब्दात निष्कर्ष लिहा. (तक्ता ७.५)

***